# प्रेस नोट दिनांक ०४/०६/२०१९
# वारजे माळवाडी पोलीस स्टेशन
# वाट चुकलेल्या वृध्द महिलेस तिच्या मुलाचा शोध घेऊन ताब्यात दिलेबाबत

दिनांक ०३/०६/१९ रोजी रात्रौ १०.०० वा चे सुमारास नियंत्रण कक्ष, पुणे शहर कडून खबर मिळाली की, एन.डी.ए चांदणी चौक येथे एक वृध्द महिला बेवारस फिरत असलेबाबत फोन कॉल प्राप्त झाला आहे. वगैरे मजकूरची खबर मिळाल्याने वारजे पोलीस चौकीचे डयुटी अंमलदार पो.हवा. चंद्रकांत मोरे, मार्शल कर्मचारी पो.शि. नितिन कातुर्डे व चव्हाण खबरीतील नमूद ठिकाणी जाऊन शोध घेतला असता, त्यांना एक वयोवृध्द महिला संभ्रमावस्थेत इकडे तिकडे फिरत असताना दिसली. त्यांनी सदर आजींना त्यांचे नाव पत्ता विचारला असता, त्या खुप घाबरलेल्या होत्या. त्यामुळे त्यांना त्यांचे नाव पत्ता काहीच सांगता येत नव्हते. म्हणून वर नमूद पोलीस कर्मचा-यांनी सदर आजींना वारजे पोलीस चौकीस आणून त्यांना पाणी पिण्यास देऊन चहा पाजला व त्यांच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी त्यांचे नाव वेणुबाई पंढरीनाथ मारणे वय ७८ वर्ष रा. मु.पो. मारणेवाडी ता. मुळशी जि. पुणे असे असल्याचे सांगितले. त्यांना त्या चांदणी चौकात कश्या आल्या याबाबत विचारणा केली असता, पुण्यामध्ये त्यांचे नातेवाईक असल्याने त्या दोन दिवसापूर्वी राहते घरातून दुपारी घरातील सर्वजण झोपले असताना कोणास काही एक न सांगता निघाले असल्याचे सांगितले. त्यांना त्यांचे घरी कोण आहे याबाबत विचारणा केली असता, त्यांनी घरी त्यांचा मुलगा श्रीहरी मारणे, सून व नातवंडे असल्याचे सांगितले. परंतु त्यांना त्यांचे मुलाचा फोन नंबर सांगता येत नव्हता.

वाट चुकलेल्या आजी हया मारणेवाडी येथे राहणा-या असल्याची माहिती प्राप्त झाल्याने वर नमूद पोलीस कर्मचारी यांनी वारजे पोलीस स्टेशन हद्दीत राहणारे मारणे आडनावाचे त्यांचे ओळखीचे तिन ते चार जणांना पोलीस चौकीला बोलावून घेऊन त्यांना वृध्द महिलेस दाखवून त्यांच्या मुलाचे नाव श्रीहरी मारणे असल्याचे सांगून मारणेवाडी गावात श्रीहरी मारणे यांना ते ओळखतात का अशी विचारणा करून श्रीहरी मारणे यांचा मोबाईल नंबर प्राप्त करण्यास कळविले. त्यावरून त्यांनी त्यांचे गावातील त्यांचे ओळखीचे लोकांना फोन करून श्रीहरी मारणे बाबत माहिती विचारून त्यांचा मोबाईल नंबर प्राप्त करून दिल्या नंतर सदर मोबाईलवर फोन करून श्रीहरी मारणे यांचेशी संपर्क साधून त्यांची आई श्रीमती वेणुबाई पंढरीनाथ मारणे हया वारजे चौकीला असलेबाबत कळवून त्यांना वारजे चौकीस बोलावून घेतले. त्यावेळी त्यांनी सांगितले की, दि ०२/०६/१९ रोजी दुपार पासून त्यांची आई घरातून बेपत्ता झाली होती. तिचा आम्ही सर्वत्र शोध घेतला होता परंतु ती मिळून आली नव्हती म्हणून उदया आम्ही पोलीसांकडे तक्रार देणार होतो. आजींनी त्यांच्या मुलास ओळखल्याने आजींना त्यांच्या मुलाच्या ताब्यात सुखरूप दिले. कोणतीही पोलीस तक्रार दाखल केलेली नसताना पोलीसांनी मेहनतीने माझा फोन नंबर मिळवून माझ्या आईला माझ्या ताब्यात सुखरूपपणे दिले याबाबत त्यांनी वर नमूद पोलीस कर्मचा-यांचे आभार मानले.

